## नियमीत दिवाणी दावा क्र. ४८/२०२० मधील

## नि.०५ वरील आदेश

## सीएनआर–एमएचएसएन १२–००११८२–२०२०

(उदय कुलकर्णी वगैरे वि. जयसिंग पाटील वगैरे )

प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद देणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादींनी निरंतर ताकीद मिळणेकरिता केलेला आहे.

३. प्रस्तुतच्या दाव्यात वादींनी असे कथन केले आहे की, मौजे सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली येथील मुळ सर्वे नं.७०९ चे शेतमिळकतीचा जुना गट नं. ३४५८ चा सद्यस्थितीचा गट नं. ३३५ मध्ये दाव्यातील परिच्छेद १अ मध्ये नमूद केलेली शेतमिळकत ही दावा मिळकत १अ म्हणून नमूद केली आहे. सदर दावा मिळकत १अ मध्ये असणारी ३० फुट व्यासाची व ३५ फुट खोल असणारी विहिर जिचे ०हे. ०५ आर एवढे विहीरपड क्षेत्र आहे. यामध्ये आठवड्यातून दोन दिवस पाणी घेण्याचा व पाणी उपसण्याचा व वाहून नेण्याचा हक्क ही दावा मिळकत १ब म्हूणन नमूद केली आहे. दावा अ मिळकतीपैकी ०हे. ४० आर एवढी मिळकत ही वादीच्या स्वतंत्र मालकी, हक्क व वहिवाटीची आहे. ती दावा मिळकत १क म्हणून नमूद केली आहे.

४. वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले की, वादी यांच्या दावा मिळकत १क मध्ये ऊसाचे पीक घेतलेले आहे व त्या पिकास दावा मिळकत १ब

म्हणजे विहिरीमधून पाळीनुसार पाणी देतात. सदर दावा मिळकत १अ ही वादीच्या वडिलांनी मानसिंग राजाराम पाटील यांना दि.१३/०३/१९९६ रोजी गहाणखताने दस्त क्र. १०४६/१९९६ ने गहाण दिली होती. परंतु, गहाण रक्कम परतफेड करुनही संबंधित व्यक्तीने वेळेत कब्जा दिला नाही. त्यामुळे, वादींना दि. ०२/०४/२०१६ रोजी दिवाणी न्यायालय, पलूस यांच्या आदेशाने तो कब्जा प्राप्त झाला. त्यावेळी वादींनी न्यायालयामार्फत रिकन्वेयन्सचा दस्त दुय्यम निबंधक, पलूस यांचे कार्यालयात दस्त क्र.१५३४/२०१७ नुसार तारीख २१/०६/२०१७ रोजी नोंदणी दस्ताने केला व अशा प्रकारे दावा मिळकत १ब व १क हि वादींच्या स्वतंत्र कब्जेवहिवाटीत होती व आहे.

५. वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले की, प्रतिवादी नं. १ पलूस सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन आहेत. प्रतिवादी नं. २ व ३ ही त्यांची मुले आहेत. वादींच्या वडिलांनी संबंधित बँकेकडे तारण गहाण कर्ज करुन दिले होते व प्रतिवादी नं. १ यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करुन वादींच्या वडिलार्जित मिळकतीचा जाहीर लिलाव केला व त्या लिलावाची बोली लावून दावा मिळकत १ अ मधील १हे. ९२ आर एवढी मिळकत लिलावाद्वारे बेकायदेशीररित्या खरेदी करुन स्वतःच्या नावे केली. त्या विरोधात वादींनी स्वतंत्र दावा रे.दि.मु.नं. २१/२०१६ दाखल केला आहे.

६.    वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले की, दावा मिळकत १ब मधील विहिरीवर वादींच्या वडिलांच्या नावे विद्युत कनेक्शन होते, ते लिलावानंतर प्रतिवादी नं. १ यांनी त्यांच्या नावे नव्याने चालू केले आहे. वादीने सन २०१६ ला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे अर्ज करुन नवीन विद्युत कनेक्शन मागितले परंतु, प्रतिवादी नं. १ यांनी वादीला विद्युत कनेक्शन मिळू नये याकरिता रे.दि.मु.नं. १२०/२०१६ चा दावा दाखल केला. त्यामध्ये, या वादींविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद मागितली होती व ती मागणी दि. ०५/०७/२०१७ रोजी न्यायालयाने आदेश पारित करुन फेटाळली. तरीही वादींवर प्रतिवादी दबाव आणू पाहात होते व त्यांना विद्युत कनेक्शन मिळण्यापासून रोखत होते. म्हणून वादीने नाईलाजाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे नवीन कनेक्शन जोडून मिळणेकामी ग्राहक मंचाकडे दाद मागितली व ग्राहक मंचाचा आदेश दि.२९/०४/२०१९ रोजी झाला, त्यानुसार, वादीला विद्युत कनेक्शन प्राप्त झाले. परंतु, वादींना प्रतिवादी विविध प्रकारे त्रास देत आहेत.

७.    वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले की, दि. ०४/०२/२००३ रोजी जाहीर लिलाव झाला मात्र त्या शेतास पर्यायी रस्ता असतानाही वादींच्या प्रस्तुतच्या दाव्यातील दावा मिळकत १क मधून रस्ता मिळावा म्हणून वादींना त्रास देण्याच्या हेतूने तहसिलदार, पलूस यांचेकडे प्रतिवादीनी सन २०१६ साली अर्ज केला व त्याबाबत रे.दि.मु.नं. १८८/२०१९ चा दावा प्रलंबित आहे. अशा परिस्थीतीत, वादींनी दावा मिळकत १क मध्ये ऊस

पीक घेतलले असून त्यास दावा मिळकत १ब मधून विहीरीतून स्वतंत्र मोटर व पाईपलाईनद्वारे पाणी देत असताना प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी संगनमत करुन हेतूपुरस्सर वादीच्या मालकीची पाईपलाईन, चेंबर फोडणे, कृषी पंपाचा स्वीच बोर्डची खांबावरील पत्र्याची पेटी तोडून टाकणे जेणेकरुन ऊसाच्या पीकाचे नुकसान होईल अशी कृत्ये प्रतिवादी करत आहेत. तसेच, शेतामधील मेहनत, मशागत जसे बैलगाडी सोडणे औताचे साहित्य ठेवणे, वैरण ठेवणे, विहीरीकडे जाणे या गोष्टींना प्रतिवादी रोखत आहेत. त्यामुळे वादींनी पलूस पोलीस स्टेशनकडे तक्रारी अर्ज देखील दाखल केला, परंतु, पोलीसांनी योग्य ती कारवाई केली नाही व जुलै–२०२० च्या दरम्यान वादींना शेतामध्ये पाणी देण्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा केला. त्यामुळे वादींना प्रस्तुतचा दावा दाखल करुन निरंतर ताकीद प्रतिवादीविरुद्ध मागणे भाग पडले आहे. त्यामुळे वादींनी प्रस्तुतच्या अर्जात तुर्तातुर्त स्वरुपाची ताकीद मागून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

८. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे नि .१९ अन्वये सादर केले व अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारली. प्रतिवादींनी असे कथन केले की, दाव्यातील चतुःसीमा व वादीच्या दस्तऐवज मधील चतुःसीमा या वेगवेगळ्या आहेत त्यामुळे दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्याने मिळकत मिळून येत नाही. जर वादीचे कथन ग्राह्य धरले तरी विहिरीतील पाणी व विहिरपड क्षेत्र वहिवाटणेचा हक्क असल्यास त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची सामाईक वहिवाट असल्याने अशा परिस्थीतीत सामाईक सहहिस्सेदाराविरुद्ध कायद्यातील

तरतुदीनुसार वादी जी दाद मागत आहेत ती दाद त्यांना मिळणेस ते पात्र नाहीत व जर वादीचा अर्ज मंजुर झाल्यास ते प्रतिवादींना दावा मिळकतीतून बाहेर काढतील व प्रतिवादींचे जास्त नुकसान होईल या कारणास्तव देखील वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो.

९. प्रतिवादींनी म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले की, गहाण फेडीच्या बाबतीत ज्या प्रक्रीया झाल्या त्या या प्रतिवादींवर बंधनकारक नाहीत. कारण वादी यांनी दावा मिळकत १ ब या मिळकतीबाबत मानसिंग राजाराम पाटील यांचेविरुद्ध गहाण फेडीबाबत डिक्री फायनल २/१५ व रेग्युलर दरखास्त नं. १३/२०१६ चे कामी न्यायालयाची दिशाभूल करुन रे.दि.मु.न. ६१/२०१२ चे हुकुनामाचे बाहेर जावून बेकायदेशीररित्या कब्जाबाबतचे कागदोपत्री हुकूम बेकायदेशीररित्या प्राप्त केले आहे. वादी कथन करतात त्याप्रमाणे गहाण फेडीच्या रे.दि.मु.न. ६१/२०१२ चे कामी दि. ०६/११/२०१४ रोजी झालेल्या आदेशात प्रस्तुतची दावा मिळकत १ब मिळकतीचा कब्जा देणेबाबत कोणताही हुकूम झालेला नाही. तसेच, डिक्री फायनल २/२०१५ चे कामी दावा मिळकत १ब या मिळकतीचा कब्जा देणेबाबत देखील कोणताही हूकूम झालेला नाही. वादींना दावा मिळकतीचे मालकी हक्क प्राप्त नाहीत. याही कारणास्तव वादींचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो.

१०. प्रतिवादींनी म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले की, सन २००३ पासून वादी हे प्रतिवादीविरुद्ध खोटी दावे करत आलेले आहेत व न्यायालयाची

सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न ते विनाकारण करत आहेत. वादीचे पूर्वहक्कदार यांनी जिवाजी यांनी विहिरीचे विद्युत कनेक्शनची रक्कम थकीत ठेवली होती. प्रतिवादीने गट नं. ३३५ मधील १हे. ९२ आर एवढे क्षेत्र खरेदी केले आहे व त्याप्रमाणे सन २००४ पासून ५ आर विहिरपड क्षेत्र प्रतिवादीच्या लाभात आहे व सदर क्षेत्र खरेदी केल्यापासून विहीरीवर नवीन विद्युत कनेक्शन प्रतिवादींनी घेतले असून त्यावरुन प्रतिवादी बागायत स्वरुपाची पिके घेत आहेत.

११. प्रतिवादींनी म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले की, वादी यांनी प्रतिवादीने खरेदी केलेल्या क्षेत्राबाबत व संपूर्ण विहिरीचे क्षेत्राबाबत रे.दि.मु.नं. २१/२०१६ चे कामी प्रतिवादी नं. १ विरुद्ध दाद मागितली आहे. वादी यांनी प्रतिवादी यांचे गट नं. ३३५ मधील ५ आर विहिरपड जागेची मालकी मान्य केली आहे. वादी यांनी गहाणफेडीचा दाखल केलेला रे.दि.मु.नं. ६१/२०१२ चा व डिक्री फायनल नं. २/२०१५ चे कामी वादीस विहिरपड क्षेत्राचा व विहिरीतील पाण्याच्या पाळीचा कब्जा देणेचा हुकूम रे.द.नं. १३/२०१६ चे कामी दिशाभूल करुन प्राप्त केला आहे. वादींनी विहिरीवर विद्युत कनेक्शन लावले म्हणून यातील प्रतिवादी यांनी रे.दि.मु.नं. १२०/२०१६ चे कामी विद्युत कनेक्शन जोडणी करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मागितली. त्यामध्ये, प्रस्तुतच्या प्रतिवादींना यश आले नाही. प्रतिवादींना खरेदी केलेल्या क्षेत्रामध्ये जाणेयेणेसाठी रस्ता नसल्याने त्यांनी तहसिलदार पलूस यांचेकडे जाणेयेणेसाठी रस्ता मागणी अर्ज केला होता व त्यानुसार तहसिलदार पलूस यांनी रस्ता मंजुर केलेला आहे.

१२. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, वादींना प्रतिवादींनी त्यांचे ० हे. ४० आर क्षेत्राच्या वहिवाटीस कधीही हरकत अडथळा केलेला नाही व अशा परिस्थीतीत वादी यांनी त्यांच्या विहिरीपड क्षेत्रावर व पाण्याची पाळीवर असणारा मालकी हक्क शाबित केल्याशिवाय वादीचा तुर्तातुर्त अर्ज चालणेस पात्र ठरत नाही, कारण आठवड्यातून दोनदा पाण्याच्या पाळीचा हक्क आहे हे वादीने सिद्ध केलेले नाही. या सर्व कारणास्तव वादींचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो आहे.

१३. अर्जातील कथने व म्हणणे व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यावर खालील मुद्दे विचारार्थ येत आहेत व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी केस असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | **होकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | **होकारार्थी** |
| ३. | वादींचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | ***अर्ज मंजुर करण्यात येतो*** |

## कारणमिमांसा

१४. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या संबंधित कागदपत्रांचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे.

१५. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस.एस. पाटील यांनी युक्तीवाद असा केला की, रे.दि.मु.न. ६१/२०१२ च्या परिच्छेद ३ मध्ये प्रस्तुतच्या दावा मिळकतीचे वर्णन आठवड्यातून दोन वेळा पाणी घेण्याच्या हक्कासह नमूद केले आहे. त्यानंतर दरखास्त दाखल करुन १३/२०१६ द्वारे ताबा मिळवला असून दस्त क्र. १५३४/२०१७ अन्वये दावा मिळकत आठवड्यातून दोन वेळा पाणी घेण्याच्या हक्कासह वादीस मिळाली आहे. त्यामुळे, न्यायालयाचा निकाल होवून देखील व न्यायालयाच्या यंत्रणेमार्फत कब्जा व दस्त होवून देखील प्रतिवादी हे या ना त्या प्रकारे वादीस हरकत अडथळा करु पाहात आहेत. वादीस हा कायदेशीर हक्क प्राप्त झाला आहे. तसेच, रे.दि.मु.न. ६१/२०१२ मध्ये झालेला निकाल हा आदरणीय अपीलाच्या न्यायालयाने बदललेला नाही. त्यामुळे, जर ताबा मिळून गहाण खत सोडवून जर वादी हे दावा मिळकत उपभोगत असतील व त्यांना प्रतिवादीकडून हरकत अडथळा होत असल्यास तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. अशा परिस्थीतीत वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजूने आहे व अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे अर्ज मंजुर करणेची विनंती त्यांनी केली.

१६. प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे श्री. व्ही.जी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी असा युक्तीवाद केला की, डि.फा. अर्ज नं. २/२०१५ नुसार वादींना विहीरीमधुन दोन दिवसाचा पाळीचा कब्जा कोणताही आदेश नसताना वादी हे न्यायालयाची दिशाभूल करुन तुर्तातुर्त ताकीदीची दाद मिळवू पाहात आहेत. तसेच, एका सहहिस्सेदाराविरुद्ध दुस–या सहहिस्सेदाराला मनाई आदेश मागता येणार नाही. कारण जर अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीच्या हक्कास अडथळा निर्माण होणार आहे. तसेच, संबंधित विद्वान विधीज्ञांनी नि.२८ ला जो लेखी युक्तीवाद सादर केला आहे, त्याचे देखील अवलोकन केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की रे.दि.मु.नं. ६१/२०१२ च्या निकालपत्राच्या आदेशाच्या भागामध्ये (operative part of judgment) प्रस्तुतच्या वादींना दोन दिवसांच्या पाण्याचा कब्जाचा हक्क दिलेला नव्हता. तसेच, डि.फा.अ.नं. २/२०१५ चे अवलोकन केले असता वादींना दोन दिवसांच्या पाण्याच्या पाळीचा हक्क मिळालेला नाही. तसेच, नि. ३०/१ चे कागदपत्राने गट नं. ३३५ ज्या चतुःसीमा दाखल केलेल्या आहेत व नि. ३०/२ उपअभिलेख अधिक्षक यांच्या अर्जातील मजकुर पाहता वादींचा अर्ज नामंजूर होणेस पात्र ठरत आहे. त्यांनी असा देखील युक्तीवाद केला की वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने नाही, अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल, या सर्व कारणास्तव वादींचा अर्ज फेटाळण्याची विनंती त्यांनी केली.

१७. प्रस्तुतकामी, रे.दि.मु.नं.६१/२०१२ च्या सही शिक्याची प्रत नि. २६/३ ला दाखल केली आहे. त्या निकालामध्ये परिच्छेद-३ मध्ये दावा मिळकतीचे वर्णन चतुःसीमेसह व आठवडयातून दोन वेळेला पाणी घेण्याच्या हक्कासह केलेले आहे व त्यानुसार वादीने प्रस्तुतच्या दाव्यात दावा मिळकतीचे वर्णन केले आहे. त्यामुळे नि.३०/१ व ३०/२ च्या कागदपत्रांपेक्षा निकालपत्रात केलेल्या मिळकतीच्या चतुःसीमेच्या वर्णनाला ज्यादा महत्व देणे न्यायोचित आहे. कारण तो निकाल हा गुणदोषावर दिला आहे. जरी संबंधित निकालपत्राच्या मुद्दा क्र. ६ मध्ये (operative part) मिळकतीचा आठवड्यातून दोनदा पाण्याच्या हक्कासह कब्जा द्यावा असे नमूद नसले तरी त्यामध्ये पुढील वाक्य नमूद आहे, the defendant is directed to hand over the possession of the suit property. त्याच निकालपत्रामध्ये, दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये परिच्छेद-३ मध्ये आठवड्यातून दोन वेळा पाणी घेण्याच्या हक्कासह, असे नमूद केले असल्याने न्यायालयाने तो हक्क देखील प्रस्तुतच्या वादीच्या लाभात दिले आहे असे या न्यायालयाचे मत आहे. या पेक्षाही न्यायालयीन यंत्रणेमार्फत दस्त करण्यापूर्वी ड्राफ्ट दाखल केला होता. त्या ड्राफ्टला देखील प्रस्तुतच्या प्रतिवादींनी म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुतच्या प्रतिवादींच्या म्हणणे विना तो ड्राफ्ट मंजुर झाला. अशा परिस्थीतीत प्रतिवादींना estoppel by conduct या तत्वाची बाधा येते.

१८. रिकन्वेयन्स दस्त क्र. १५३४/२०१७ मध्ये संबंधित गटाच्या विहिरीतून पाणी घेण्याच्या हक्कासह दावा मिळकत ही वादींना प्राप्त झाली आहे.

सदरील दस्त हा बेकायदेशीर आहे अशा प्रकारचा कोणताही निकाल सक्षम न्यायालयाचा झालेला नाही. अशा परिस्थीतीत न्यायालयाचे रे.दि.मु.न. ६१/२०१२ मध्ये दिलेल्या निकालाच्या आधारे व त्यानुसार झालेल्या ड्राफ्ट नुसार प्रस्तुतच्या वादींना विहिरीतून आठवड्यातून दोन वेळेला पाणी घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे असे म्हणणे योग्य आहे. रे.दि.मु.नं. ६१/२०१२ मधील निकाल व हुकुमनामा हा योग्यच आहे व त्यानुसार ड्राफ्ट झाला देखील योग्यच वाटत आहे. त्यामुळे वादींचा देखील कब्जा हा प्रथमदर्शनी निश्चितपणे दिसून येत आहे. वादाकरिता जरी असे पकडले की न्यायालयाचा निकाल व हुकूमनामा व ड्राफ्ट हा चुकीचा आहे तरी देखील न्यायिक तत्वांचा विचार करता जोपर्यंत सक्षम न्यायालयाकडून त्यामध्ये बदल होत नाही, तोपर्यंत तो निकाल संबंधित पक्षकारांवर बंधनकारक राहील, या करिता मी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे.

***I. Vidya Sagar Singh Vs. G. P. Pant University of Agricultural Technology & Ors. 2019 SCC Online Utt 473***, wherein Hon'ble Uttarakhand High Court has held that whenever any judgment is decided by the competent court then it is binding upon those parties and it cannot be re-agitated in collateral proceedings. An order or judgment of Court/tribunal even if, erroneous, is binding on the parties. The bindingness is the character of judgments, of courts of competent jurisdiction, is the essence and part of rule of law on which administration of justice is founded.

१९. सदरकामी, **विद्यासागर सिंग** या न्यायनिर्णयाचे प्रमाण देखील उपयोगी पडत आहे. तसेच, एक सहहिस्सेदार जेव्हा अन्य सहहिस्सेदाराविरुद्ध दाद मागू शकत नाही. हा नियम सरसकट प्रत्येक दाव्यामध्ये उपयोगी पडतोच असे नाही. कारण, प्रत्येक दाव्याची परिस्थीतीवर ते अवलंबून राहते. प्रस्तुतच्या दाव्यातील परिस्थीतींचा विचार करता जे प्रतिवादी नं. १ ते ३ चे विद्वान विधीज्ञांनी जो युक्तीवाद सहहिस्सेदाराच्या मुद्दावर केला, त्यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसून येत नाही. तुर्तातुर्त ताकीद अर्ज गुणदोषावर ठरवताना प्रथमदर्शनी केस वादीने दाखवली आहे का नाही हे पाहणे आवश्यक आहे. तशी केस वादीने दाखवून दिलेली आहे. न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे प्रतिवादीपेक्षा जास्त नुकसान होईल. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी 'होकारार्थी' देतो. मुद्दा क्र. ४ चे उत्तर मी खालील प्रमाणे देतो.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी स्वतः अथवा त्यांचे एजंट अथवा त्यांचे मार्फत अन्य इसमाने दाव्यामध्ये नमूद केलेल्या दावा मिळकत १ब ला म्हणजेच संबंधित विहिरीतून आठवड्यातून दोन वेळेला पाणी घेण्याच्या वादीच्या

हक्कास व पाणी उपसण्याच्या हक्कास, पाणी वाहून नेण्याच्या यंत्रास व साहित्यास तसेच वादींच्या दावा मिळकत १क मध्ये असणा–या दावा मिळकतीला देखील वादींच्या मालकी हक्कास, कब्जे वहिवाटीस, पीकास, पाईप लाईनला दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत आजपासून कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा अथवा नुकसान करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

३. सदर अर्जाचा खर्च मूळ दाव्याचे खर्चामध्ये समाविष्ट करणेत यावा.

**(खुल्या न्यायालयात जाहीर )**

सही/–

**पलुस.** **(नि.दि. रुद्रभटे )**

**दिनांक– ०६/१२/२०२१** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pravin G. Sabale |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 06/12/2021 |
| Signed by the Presiding Officer on | : | 06/12/2021 |
| Uploaded on | : | 08/12/2021 |